Let the mind manage the body
Que l'esprit gère le corps

# MARATHI
(Subject code No. P190)

**Index Number:** ..............................................................................................................................

# MAURITIUS EXAMINATIONS SYNDICATE

## Primary School Achievement Certificate Assessment

## October 2019

## Time: 1 hour 45 minutes


**INSTRUCTIONS TO CANDIDATES**

1. Check that this assessment booklet contains **9** questions printed on **17** pages.
2. Write your Index Number on the assessment booklet in the space provided above.
3. You should not use red, green or black ink in answering questions.
4. Write all your answers clearly in the assessment booklet.
5. Attempt **all** questions.

| Question | Marking | | Revision | | Control | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | Sig | Marks | Sig | Marks | Sig |
| 1A | | | | | | |
| 1B | | | | | | |
| 2A | | | | | | |
| 2B | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4A | | | | | | |
| 4B | | | | | | |
| 5A | | | | | | |
| 5B | | | | | | |
| 6 | | | | | | |
| 7A | | | | | | |
| 7B | | | | | | |
| 8 | | | | | | |
| 9 | | | | | | |
| **Total** | | | | | | |
| **Sig (HoG)** | | | | | | |

© Mauritius Examinations Syndicate

**Question 1 A (5 marks)**
**चित्र ओळखा आणि नाव लिहा.**




खुर्ची













Marks


**Question 1 B (5 marks)**


**योग्य चित्र आणि वाक्य जुळवा.**












मुले आपली सायकल चालवत आहेत.

सानवी दुकानात मिठाई विकत घेत आहे.

मांजर झोपत आहे.

अनिल आणि शीला बसने प्रवास करत आहेत.

शिक्षिका धडा शिकवत आहे.

मधू डॉक्टरकडे गेली आहे.

## Question 2A (10 marks)

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

**उदाहरणः** ताईने मिठाई तयार ......... होती.

अ. केला    (ब.) केली

क. केले    ड. केल्या

१. ते मूल ......... लिहित आहे.

अ. पेनमध्ये    ब. पेनकडे

क. पेनने    ड. पेनला

२. ......... इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी आहे.

अ. आम्ही    ब. तुम्ही

क. ती    ड. ते

३. आम्ही बागेत बसू शकत नाही ......... पाऊस पडत आहे.

अ. किंवा    ब. कारण

क. पण    ड. तेव्हा

४. मागच्या आठवड्यात, लिनाने एक चांगला चित्रपट ..........

अ. पाहता    ब. पाहील

क. पाहते    ड. पाहिला

५. जेव्हा मी माझ्या मित्रांना भेटेन तेव्हा आम्ही बरोबर ...........

अ. खेळला होता    ब. खेळू

क. खेळत आहे    ड. खेळले



Please turn over this page

Marks

६. काल मामांनी आमच्यासाठी ......... आंबे आणले.

अ. पिकलेला ब. पिकलेले

क. पिकलेली ड. पिकलेल्या

७. हे ......... जुने दप्तर आहे.

अ. माझा ब. माझी

क. मला ड. माझे

८. त्या झाडावर तीन छोटी कबुतरे ......... आहेत.

अ. बसला ब. बसत

क. बसतो ड. बसल्या

९. जर बाबा लवकर येतील ......... आम्ही बागातेलला जाऊ.

अ. जेव्हा ब. तेव्हा

क. तर ड. पण

१०. काल........ वादळ येत आहे.

अ. पासून ब. पर्यंत

क. ला ड. जवळ

**Question 2B (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. मंजू ......... बातमी ऐकत होती.

अ. मेणबत्तीने     ब. रेडिओवर

क. फ्रीजवर     ड. पंख्याने

२. गोष्टींची पुस्तके वाचण्यासाठी रोहन ......... गेला.

अ. रुग्णालयाला     ब. बाजाराला

क. दुकानाला     ड. पुस्तकालयाला

३. माझ्यावर चहा सांडला. आता माझे कपडे ......... झाले.

अ. मळके     ब. सुंदर

क. स्वच्छ     ड. नवे

४. मला झोपायचे आहे कारण मी खूप ......... आहे.

अ. तहानलेले     ब. सुकलेले

क. भुकेलेले     ड. थकलेले

५. जोराने ......... नकोस! तू पडशील.

अ. खाऊ     ब. पाहू

क. लिहू     ड. धावू

Marks

**Question 3 (10 marks)**
**खालील पोस्टर वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

## पंडित सहदेव शाळा
## चला, सहलीला जाऊ या!

तुम्ही सहावीच्या वर्गात आहात? तर आमच्याबरोबर पंडित सहदेवच्या वार्षिक सहलीला चला!

सहल पुढीलप्रमाणे असणारः

तारीख : गुरुवारी १८ जुलै २०१९
बस निघण्याची वेळ : ०९ ००
बस परत येण्याची वेळ : १६ ००
बसची फी : ५० रुपये




तुम्ही पुढील जागा पाहणारः

- पांप्लेमुस उद्यान
- पोर्ट लुईस बाजार

तुमच्याबरोबर पुढील सामान आणायला विसरू नकाः

- दुपारचे जेवण
- टोपी
- पोहण्याचे कपडे

दुपारी आम्ही ग्रां बे समुद्रकाठी जाऊ. तेथे तुम्ही खाऊ शकता आणि पाण्यात खेळू शकता!
तुम्हाला तुमच्या पालकांची परवानगी पाहिजे.

तुम्हाला जाण्याची इच्छा आहे का? कृपया, शुक्रवारी १२ जुलै २०१९ पर्यंत मुख्यगुरुजी, श्री गोविंद यांना भेटून तुमचे नाव द्या.

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कोणत्या शाळेने हा पोस्टर लिहिलेला आहे?

........................................................[1]

Marks

२. कोणत्या वर्गाची मुले सहलीला जाऊ शकतात?

..................................................................[1]

३. कोणत्या तारखेला सहल असेल?

..................................................................[1]

४. किती वाजता बस शाळेतून निघेल?

..................................................................[1]

५. सहलीसाठी बसची फी किती रुपयांची आहे?

..................................................................[1]

६. एका जागेचे नाव लिहा जी मुले पाहायला जातील.

..................................................................[1]

७. दोन सामानांची नावे लिहा जे मुलांनी आपल्याबरोबर आणावे.

(i)..................................................................[1]

(ii)..................................................................[1]

८. मुले कोठे जेवण घेतील?

..................................................................[1]

९. मुलांना जाण्याची इच्छा असेल तर कोणाला भेटावे?

..................................................................[1]



Please turn over this page

## Question 4 (15 marks)

**खालील उतारा वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

मागच्या शुक्रवारी रोहन चार वाजता शाळेतून घरी परत आला. जसा तो आत शिरला, त्याने टीव्ही लावला. त्याचा आवडता कार्यक्रम सुरू होणार होता.

काही वेळानंतर, त्याची आई त्याच्याशी बोलायला आली. रोहनला वाटले की त्याच्या आईचा आवाज नेहमीसारखा नव्हता.

"रोहन, मला बरे वाटत नाही. मला ताप आलेला आहे आणि माझा गळा दुःखत आहे."

"काळजी करू नकोस आई, जा आराम कर," त्याने तिला सांगितले.

काही मिनिटांनंतर, रोहनचे बाबा कामावरून घरी आले. जेव्हा त्यांना ऐकू आले की त्यांची बायको आजारी होती तेव्हा त्यांना काळजी वाटली. परंतु आईने त्यांना सांगितले की तिची तब्येत इतकी वाईट नव्हती व तिला डॉक्टरची आवश्यकता नव्हती. तिला फक्त आराम करण्याची जरुरी होती. हे ऐकल्यावर बाबा आणि रोहन, दोघांना बरे वाटले.

"आम्ही घराची साफसफाई करू का?" बाबा म्हणाले.

"ठीक," रोहनने उत्तर दिले. त्याला आपला आवडता कार्यक्रम पाहता येणार नाही याबद्दल तो निराश होता, परंतु आईला मदत करणे जास्त महत्त्वाची होती.

"मी भांडी घासेन आणि खोल्या झाडेन. तुम्ही अंगण साफ कराल आणि जेवण तयार कराल का?" रोहनने बाबांना विचारले.

वेळ न लावता, रोहनने झाडू घेतला आणि फरशी साफ केली. हे झाल्यावर त्याने सर्व भांडी घासली.

तोपर्यंत बाबा अंगण साफ करीत होते. मग त्यांनी खिचडी, हे स्वादिष्ट जेवण तयार केले. त्यांना माहीत होते की त्यांच्या बायकोला ही खूप आवडते.

सहा वाजता, घर व अंगण अगदी स्वच्छ होते आणि जेवणाच्या टेबलावर गरम जेवण तयार झाले होते. जेव्हा रोहनची आई आराम करून उठली तेव्हा तिला अभिमान वाटला.

"माझे कुटुंब खूप प्रेमळ आहे," ती स्वतःला म्हणाली.

**Question 4A (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. जसा रोहन घरी आला तसा ..................

अ. त्याने आपल्या आईला शोधले.

ब. त्याने टीव्ही पाहिला.

क. तो झोपायला गेला.

ड. त्याने अंगण साफ केले.

२. रोहनला कळले की त्याची आई आजारी होती कारण .............

अ. घर साफ करायचे होते.

ब. जेवण तयार झाले नव्हते.

क. तिला खिचडी खायची होती.

ड. तिचा आवाज नेहमीसारखा नव्हता.

३. जेव्हा रोहनच्या बाबांना कळले की त्यांची बायको बरी नव्हती तेव्हा त्यांना .................. वाटली.

अ. काळजी

ब. आनंद

क. अभिमान

ड. थकवा

४. कोणत्या शब्दावरून आपल्याला कळते की जेवण चांगले होते?

अ. स्वादिष्ट

ब. साफ

क. निराश

ड. प्रेमळ

५. आईला मदत करण्यासाठी, रोहन .............

अ. डॉक्टरला बोलावतो.

ब. भांडी घासतो.

क. शाळेला जातो.

ड. टीव्ही लावतो.

**Question 4B (10 marks)**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. रोहनच्या आईला कोणता आजार झाला होता?

..........................................................

..........................................................[1]

२. आम्हाला कसे कळते की आईची तब्येत इतकी वाईट नव्हती?

..........................................................

..........................................................[1]

३. टीव्ही पाहण्याऐवजी रोहनने आईला मदत केली. खाली दिलेल्या **<u>दोन</u>** शब्दांभोवती वर्तुळ काढा जे रोहनचे वर्णन करतात.

| | | | |
|---|---|---|---|
| दयाळू | मदतगार | सहनशील | प्रामाणिक |

[2]

४. मदत करण्यासाठी रोहनच्या बाबांनी काय केले?

..............................................................

.............................................................. [1]

५. पुढील वाक्ये उताऱ्यानुसार योग्य क्रमात लिहा. पहिले वाक्य देण्यात आले.

- रोहनचे बाबा कामावरून आले. [ ]
- रोहन शाळेतून आला. [ १ ]
- रोहनची आई त्याला सांगते की ती आजारी आहे. [ ]
- रोहनची आई आराम करून उठते. [ ]

[3]

६. (i) शेवटी रोहनच्या आईला आपल्या कुटुंबाबद्दल कसे वाटते?

..............................................................

..............................................................[1]

(ii) तिला असे का वाटते?

..............................................................

..............................................................[1]

Marks

**Question 5A (4 marks)**

**वाक्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.**

**(अ) खालील शब्द योग्य क्रमाने लिहून वाक्ये लिहा.**

१. मला – छानशी – नाताळनिमित्त – मिळाली – बाहुली

..........................................................

..........................................................

२. विकत - गाडी - नवी - एक - घेतली – आईने

............................................................

............................................................

**Question 5B (6 marks)**

**(ब) खाली दिलेली अपूर्ण वाक्ये पूर्ण करा.**

१. श्याम रडतो कारण ..........................................

.....................................................

२. अनेक दिवसांपासून पाऊस पडत नाही म्हणून ......................

.....................................................

३. जेव्हा सूर्य उगवतो तेव्हा ...................................

.....................................................

**Question 6 (10 marks)**

**खालील गोष्ट वाचून मोकळया जागी योग्य शब्द भरा.**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| **वाटले** | **त्याला** | **मिनिटे** | **झाडावरून** | **उठले** |
| **खूप** | **खोलीत** | **झोपत** | **गोष्टी** | **ऐकू** |

रात्री दहा वाजले होते. मी माझ्या ………..…….. गृहपाठ करीत होते. बाकीचे सर्वजण ………..…….. होते.

अचानक मला बाहेरून एक मोठा आवाज ………..…….. आला. लगेच माझे आईवडील आणि माझा भाऊ ………..…….. . आवाज बागेतून आला. आम्हाला ………..…….. की बागेत चोर होता. वेळ न लावता, आम्ही ………..…….. शोधायला लागलो.

मला ………..…….. भीती वाटली. मी चोरांच्या ………..…….. ऐकल्या होत्या.

आम्ही पाच ………..…….. बागेत शोध लावला परंतु काहीच दिसले नाही. शेवटी आम्हाला आमच्या लिचीच्या ………..…….. वटवाघुळे उडताना दिसली. तेव्हा आम्हाला कळले की खरे चोर कोण होते!


वटवाघुळे

**Question 7A (5 marks)**

**खाली दिलेल्या वाक्यात काही चुकीचे शब्द अधोरेखित आहेत. कंसातील  मोकळया जागी त्या शब्दाचे योग्य रूप लिहा.**

१.अंजनाने एक सुंदरशी **कवीता** रचली. (................)

२. मावसांनी मला एक **चान** दप्तर दिले. (................)

३. अजयच्या घराजवळ एक **नडी** आहे. (...............)

४.मामीने एक नवी **फुलदानी** आणली. (................)

५. माझा **मीत्र** अंगणात खेळतो. (................)

**Question 7B (5 marks)**

**कंसातील शब्दांचे योग्य रूप लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१. वाघ आणि सिंह (रान) ............... जनावरे आहेत.

२. काल आम्ही एक (विनोद) ............... नाटक पाहिले.


३. प्रियाने एक (गंमत) ............... कथा वाचली.

४. माझी शिक्षिका खूप (चांगलेपणा) ............... आहे.

५. अक्षयचे पैसे हरवले म्हणून तो (दुःख) ............... आहे.

**Question 8 (10 marks)**


**खाली दिलेल्या प्रत्येक चित्रावर एक वाक्य लिहून <u>गोष्ट लिहा</u>. तुम्हाला दिलेल्या शब्दांचाच वापर करावा.**



काल – जाणे

______________________________________


______________________________________



अचानक – बंद पडणे

______________________________________


______________________________________



मग – फोन करणे

______________________________________


______________________________________



काही वेळानंतर – मदत

______________________________________

______________________________________



शेवटी – आनंदाने

______________________________________

______________________________________

## Question 9 (10 marks)

**दिलेल्या मुद्यांच्या आधारे सुमारे १०० शब्दांचा एक निबंध लिहा.**

- रस्त्यावर चालणे
- पर्स सापडणे
- पर्समध्ये नाव आणि फोन नंबर
- नंतर तुम्ही काय करता?
- शेवटी काय होते?

Marks

**BLANK PAGE**